मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# पिंपरी-चिंचवडमध्ये ‘भटके-विमुक्त दिवस’; 31 ऑगस्टला कार्यक्रम'!

## परिसंवाद, आरोग्य शिबिर आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन!

» पिंपरी | प्रतिनिधी

**शासनाच्या निर्देशानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी ‘भटके-विमुक्त दिवस’ साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त भाटनगर, लिंक रोड, पिंपरी येथे विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये परिसंवाद, आरोग्य शिबिर तसेच भटके-विमुक्त समाजाच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.**



### ‘भटक्या-विमुक्त समाजा’वर परिसंवाद

सायंकाळी ५.३० वाजता ‘भटक्या-विमुक्त समाजाची दशा आणि दिशा’ या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात पद्मश्री गिरीश प्रभुणे, माजी जनसंपर्क अधिकारी रमेश भोसले, कामगार नेते तथा भाट समाज सेवा ट्रस्टचे शहर अध्यक्ष मनोज माछरे, भटक्या-विमुक्त जाती-जमाती सामाजिक आधार संघटनेचे अध्यक्ष हरी सावंत, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अशासकीय सदस्य किशोर शिंदे आणि भटके-विमुक्त प्रवर्गाचे अभ्यासक भरत विटकर सहभागी होणार आहेत.

महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सायंकाळी ५ वाजता कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तसेच मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यसभा सदस्य मेधा कुलकर्णी, पार्थ पवार, लोकसभा सदस्य सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, विक्रम काकडे, शंकर मांडेकर यांच्यासह महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, विविध समित्यांचे सभापती, नगरसेवक तसेच महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत

भटके-विमुक्त समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास, त्यांच्या प्रश्नांची सद्यस्थिती तसेच भविष्यातील वाटचाल या विषयांवर परिसंवादातून विचारमंथन करण्यात येणार आहे.

‘भटके-विमुक्त लोकसंस्कृतीचा जागर’ सांस्कृतिक कार्यक्रम. सायंकाळी ७ वाजता निर्मिक आर्टस् मिडिया प्रस्तुत ‘भटके-विमुक्त लोकसंस्कृतीचा जागर’ हा प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. लोककला, परंपरा आणि संस्कृतीच्या माध्यमातून भटके-विमुक्त समाजाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा नागरिकांसमोर मांडण्यात येणार आहे.

‘भटके-विमुक्त दिवस’ हा केवळ स्मरणाचा दिवस न राहता समाजाच्या प्रश्नांवर संवाद, जनजागृती आणि सामाजिक समतेचा संदेश देणारा ठरावा, या उद्देशाने महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रम स्थळ : भाटनगर, लिंक रोड, पिंपरी, पुणे-१७
दिनांक : सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६
वेळ:सायंकाळी ५.००वाजता.

# रक्षाबंधनानिमित्त शालेय विद्यार्थिनींनी अधिकारी, पोलीस व सुरक्षा रक्षकांना बांधली राखी

» पिंपरी | प्रतिनिधी

**रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ बहिणीच्या नात्यातील प्रेमाचा उत्सव नव्हे, तर एकमेकांच्या सुख दुःखात सोबत राहण्याची आणि रक्षणाची भावना जपणारा सण. याच भावनेला सामाजिक कृतज्ञतेची जोड देत चिखली येथील इनाव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूलच्या विद्यार्थिनींनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले. शहराच्या सुरक्षिततेसाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत असलेले महापालिका अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना विद्यार्थिनींनी राखी बांधून आपुलकी, सन्मान आणि कृतज्ञतेचा संदेश दिला.**



महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी नगरसदस्य विकास साने, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि विशेष अधिकारी किरण गायकवाड यांची भेट घेतली. विद्यार्थ्यांनी त्यांना राखी बांधून औक्षण केले. यावेळी महापालिका परिसराची सुरक्षा सांभाळणाऱ्या सुरक्षा रक्षकांनाही विद्यार्थ्यांनी राखी बांधली. तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या पिंपरी चिंचवड पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना देखील त्यांनी राखी बांधून त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक सलाम केला.

राखी बांधल्यानंतर विद्यार्थिनींनी अधिकारी, कर्मचाऱ्यांशी साधला मनमोकळा संवाद राखी बांधल्यानंतर विद्यार्थिनींनी अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. रक्षाबंधनाचा सण कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता शहरासाठी आणि समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी म्हणून या उपक्रमाकडे पाहत असल्याची भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाच्या सणाचे महत्त्व आणि भाऊ बहिणीच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा व परस्पर रक्षणाची भावना अधोरेखित करणारे गीत सादर केले. विद्यार्थ्यांच्या निरागस स्वरांनी आणि उत्स्फूर्त सहभागाने महापालिका परिसरातील वातावरण अधिक प्रसन्न झाले. आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या व्यक्तींप्रती आदर व्यक्त करण्याची भावना विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणातून दिसून आली.

### राखीच्या धाग्यातून सामाजिक बांधिलकीचा संदेश

रक्षाबंधनाच्या निमित्ताने घेतलेला हा उपक्रम प्रेम आणि स्नेहापुरता मर्यादित न राहता सामाजिक भान आणि कृतज्ञतेची जाणीव जागवणारा ठरला. नागरिकांची सेवा करणारे महापालिका अधिकारी कर्मचारी, शहराच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणारे सुरक्षा रक्षक आणि कायदा सुव्यवस्था राखणारे पोलीस हे समाजाच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत.


# शिल्पा गवारे प्रकरण फास्ट ट्रॅकवर; फडणवीसांचा कठोर कारवाईचा शब्द!

## हुंड्यासाठी छळ आणि हत्येचा माहेरच्यांचा गंभीर आरोप; पतीसह चौघांना अटक!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये शिल्पा गवारे यांच्या मृत्यूच्या घटनेने पुन्हा एकदा हुंडाबळी आणि विवाहितेच्या छळाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शिल्पा यांच्या मृत्यूला सासरच्या मंडळींकडून होणारा मानसिक व शारीरिक छळ तसेच हुंड्याची मागणी कारणीभूत असल्याचा आरोप त्यांच्या माहेरच्या कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुटुंबीयांशी फोनवरून संवाद साधत प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याचे आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.**





शिल्पा गवारे या भाजप नगरसेविका स्नेहा कलाटे यांच्या नणंद होत्या. रक्षाबंधनाच्या दिवशी स्नेहा कलाटे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी संवाद साधून शिल्पाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली. वाकड परिसरात अल्पावधीत अशा दोन घटना घडल्याचा उल्लेख करत त्यांनी हुंड्यासाठी विवाहित महिलांवर होणाऱ्या छळाला आळा घालण्याची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींना कठोर शिक्षा मिळेल, असे आश्वासन दिल्याचे कुटुंबीयांनी म्हटले आहे.

कुटुंबीयांच्या आरोपानुसार, शिल्पा यांचा पती सचिन, सासरे उत्तम, सासू संजीवनी आणि दीर संदीप यांच्याकडून दीर्घकाळ मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला. दोन एकर जमीन, व्यवसायासाठी आर्थिक मदत तसेच वेळोवेळी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम देऊनही सासरच्या मंडळींची पैशांची मागणी थांबली नाही, असा आरोप माहेरच्या कुटुंबीयांनी केला आहे.

मुलगी सुखी राहावी, या अपेक्षेने कलाटे कुटुंबीयांनी शक्य ती आर्थिक मदत केल्याचे सांगितले जाते. मात्र, त्यानंतरही छळ सुरूच राहिल्याने शिल्पाच्या आई-वडिलांनी आणि भावांनी तिला माहेरी परतण्याची विनंती केली होती. मात्र, कुटुंबाचा विचार करून शिल्पा सासरीच राहिली. अखेर तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.

### आरोपींना ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी!

शिल्पा गवारे प्रकरणात पती सचिन, सासू संजीवनी, सासरे उत्तम आणि दीर संदीप यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने चौघांनाही ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा विविध अंगांनी तपास सुरू असून शिल्पाच्या मृत्यूमागील नेमके कारण, हुंड्याच्या मागणीचे आरोप आणि हत्येची शक्यता याबाबत पुरावे तपासले जात आहेत.

शिल्पाचा मृत्यू आत्महत्या नसून हत्या असल्याचा गंभीर आरोपही माहेरच्या कुटुंबीयांनी केला आहे. याप्रकरणी वाकड पोलिसांनी गुन्हा दाखल करून पतीसह सासू, सासरे आणि दीराला अटक केली आहे.

दरम्यान, शिल्पाच्या मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. शिल्पाने गळफास घेतला त्यावेळी तिच्या बेडरूमचे दार उघडे होते आणि घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली. त्या वेळी पती सचिन घरात असतानाही तो बेडरूममध्ये का नव्हता, यासह अनेक बाबींचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

प्रथमदर्शनी पंचनामा आणि तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीच्या आधारे हत्येच्या शक्यतेचाही तपास केला जात आहे. विशेष म्हणजे, शिल्पाच्या पतीविरुद्ध लग्नापूर्वी हत्येचा गुन्हा दाखल असल्याची माहिती तपासात समोर आल्याने या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले आहे.

# माऊलींसाठी आली मुक्ताईची राखी; बंधुप्रेमाचा अनोखा सोहळा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त मुक्ताई संस्थान, मुक्ताईनगर यांच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिरात राखी अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे समाधी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. संतांच्या चरणी राखी अर्पण करण्याच्या या परंपरेतून भक्तिभावासोबतच प्रेम, विश्वास आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.**



यावेळी मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष रवींद्र भैया पाटील, ह.भ.प. रवींद्र महाराज हारणे आणि संदीप पाटील यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीला विधिवत राखी अर्पण केली. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या विश्वस्त ॲड. रोहिणीताई पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेत भावपूर्ण अभिवादन केले.

रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी दृढ करणारा सण आहे. याच भावनेतून संतांच्या चरणी राखी अर्पण करून समाजामध्ये बंधुभाव, परस्पर स्नेह आणि ऐक्याची भावना अधिक दृढ व्हावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या विचारांतून समाजाला समता, बंधुभाव, मानवता आणि अध्यात्माचा मार्ग दाखविला. त्यांच्या समाधीला रक्षाबंधनाच्या दिवशी राखी अर्पण करण्यामागेही सामाजिक ऐक्य आणि अध्यात्मिक मूल्यांचा संदेश अधोरेखित करण्याचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

संतांच्या शिकवणीचा समाजात प्रसार व्हावा आणि विविध घटकांमध्ये प्रेम, आपुलकी व एकोप्याची भावना निर्माण व्हावी, यासाठी अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व मोठे आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी अर्पण करण्यात आलेली राखी ही भक्तिभावासोबतच समाजातील बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक ठरली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने समाधी मंदिरात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संत ज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन घेत भाविकांनी रक्षाबंधनाचा सण भक्तिभावाने साजरा केला. राखी अर्पणाच्या कार्यक्रमादरम्यान मंदिर परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवर आणि भाविकांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचे स्मरण करत समाजात प्रेम, बंधुभाव, ऐक्य आणि अध्यात्मिक मूल्यांची वृद्धी व्हावी, अशी भावना व्यक्त केली. मुक्ताई संस्थानच्या या उपक्रमाला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीला राखी अर्पण!

रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त मुक्ताई संस्थान, मुक्ताईनगरच्या वतीने आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिरात राखी अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. भक्ति, श्रद्धा आणि अध्यात्मिक वातावरणात झालेल्या या उपक्रमातून प्रेम, विश्वास, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांमधून समाजात समता, मानवता आणि एकोप्याची भावना अधिक दृढ व्हावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी नतमस्तक होत समाजाच्या सुख, शांती आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली.

# डीजेला 'ब्रेक', लेझर-प्रेशर मिडवरही बंदी; मोहोळांचा स्पष्ट इशारा!

## डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला विरोध; नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन!

**» पुणे | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवातील डीजे, लेझर आणि प्रेशर मिडच्या वापरावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांना त्रास होत असल्याने उत्सवात डीजेसह लेझरचे झोत आणि प्रेशर मिडचा वापर कटाक्षाने टाळला पाहिजे, असे मोहोळ यांनी म्हटले आहे.**



गणेशोत्सवातील ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा सध्या पुण्यात चांगलाच चर्चेत आहे. डीजे, प्लाझ्मा आणि मोठ्या ध्वनिवर्धकांच्या भिंतींमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाविरोधात सामाजिक कार्यकर्त्यांनी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्ष आणि गणेश मंडळांकडून वेगवेगळ्या भूमिका मांडल्या जात आहेत. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न अधिक तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी कायद्याने ठरवून दिलेल्या ध्वनिमर्यादांचे पालन करूनच गणेशोत्सव साजरा करण्याची गरज व्यक्त केली. उत्सवाचा जल्लोष आणि नागरिकांचे हित यामध्ये समतोल राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्याचवेळी पुण्याच्या गणेशोत्सवाची पारंपरिक ओळख असलेल्या ढोल-ताशांवर अनावश्यक निर्बंध लादू नयेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

"गणेशोत्सव हा केवळ कार्यकर्त्यांचा नव्हे, तर लोकांचा उत्सव आहे. उत्सवात लोकसहभाग वाढविताना नागरिकांना त्रास होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे," असे मोहोळ यांनी सांगितले. त्यामुळे उत्सवाचा आनंद कायम ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे पालन करणे ही गणेश मंडळांचीही जबाबदारी असल्याचे त्यांच्या भूमिकेतून स्पष्ट झाले.

दरम्यान, भाजपमधील काही लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी डीजेला समर्थन देत असल्याच्या चर्चेवरही मोहोळ यांनी स्पष्टीकरण दिले. नगरसेवक बापू मानकर यांनी 'उत्सवाला फार बंधने नकोत' असे म्हटले होते. मात्र, 'डीजेला परवानगी द्या, अन्यथा गणपती बाहेर काढणार नाही,' असे त्यांनी म्हटलेले नाही, असे मोहोळ यांनी स्पष्ट केले.

गणेशोत्सवातील डीजेच्या वाढत्या आवाजावरून नागरिकांच्या तक्रारी, न्यायालयीन हस्तक्षेप आणि गणेश मंडळांच्या भूमिका यामुळे पुण्यात वातावरण तापले आहे. एका बाजूला नागरिकांना होणारा ध्वनिप्रदूषणाचा त्रास कमी करण्याची मागणी होत आहे, तर दुसरीकडे उत्सवावरील अनावश्यक निर्बंधांना गणेश मंडळांकडून विरोध केला जात आहे.

विशेषतः पारंपरिक ढोल-ताशा आणि आधुनिक ध्वनिव्यवस्था यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन काय असावा, यावरही चर्चा सुरू झाली आहे. अशा परिस्थितीत कायद्याने निश्चित केलेल्या ध्वनिमर्यादा पाळून उत्सव साजरा करणे आणि त्याचवेळी पुण्याची पारंपरिक गणेशोत्सव संस्कृती जपणे, अशी संतुलित भूमिका मोहोळ यांनी मांडली आहे.

आता गणेशोत्सव जवळ येत असताना प्रशासनाकडून ध्वनिप्रदूषणाबाबत कोणत्या उपाययोजना केल्या जातात आणि गणेश मंडळांकडून त्याला कितपत प्रतिसाद मिळतो, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

### गणेशोत्सवावर मोहोळांची स्पष्ट भूमिका!

गणेशोत्सवातील डीजे, प्लाझ्मा आणि मोठ्या ध्वनिवर्धकांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा पुण्यात ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी कायद्याने ठरवलेल्या ध्वनिमर्यादांचे पालन करूनच गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. मात्र, पुण्याची पारंपरिक ओळख असलेल्या ढोल-ताशांवर अनावश्यक निर्बंध लादू नयेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. 'गणेशोत्सव हा केवळ कार्यकर्त्यांचा नव्हे, तर लोकांचा उत्सव आहे,' असे सांगत नागरिकांना त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहनही मोहोळ यांनी केले.

# तासिका शिक्षकांना मोठा दिलासा! मानधनात वाढ, तासाला २५० रुपयांपर्यंत!

**» पुणे | प्रतिनिधी**

**राज्यातील शासकीय निवासी शाळांमध्ये तासिका तत्त्वावर (CHB) कार्यरत शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. वाढती महागाई आणि सध्याचे कमी मानधन यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षक उपलब्ध होण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. आता पात्रतेनुसार तासिका तत्त्वावरील शिक्षकांना २०५ ते २५० रुपये प्रतितास या सुधारित दराने मानधन मिळणार आहे.**



सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने याबाबत शासन निर्णय प्रसिद्ध केला असून, सुधारित मानधनाचे दर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून लागू करण्यात येणार आहेत. सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती आणि नवबौद्ध मुला-मुलींसाठी राज्यभरात १०० शासकीय निवासी शाळा चालविल्या जातात. या शाळांमध्ये नियमित शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ११ महिन्यांच्या कालावधीसाठी तासिका तत्त्वावर शिक्षकांची नियुक्ती केली जाते.

यापूर्वी आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये निश्चित करण्यात आलेले मानधन सध्याच्या परिस्थितीच्या तुलनेत कमी होते. दरम्यानच्या काळात महागाई वाढली असून, कमी मानधनामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षक उपलब्ध होण्यात अडचणी येत होत्या. निवासी शाळांचे स्वरूप लक्षात घेता शिक्षकांना केवळ अध्यापनाचे काम न करता पूर्णवेळ उपस्थित राहून 'दैनंदिन पर्यवेक्षक' म्हणूनही जबाबदारी पार पाडावी लागते. तसेच अपेक्षित शैक्षणिक क्षमता पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त तास घेणे आवश्यक असते. त्यामुळे शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षक उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने मानधनवाढ करण्यात आली आहे.

सुधारित दरांनुसार दरमहा १०५ तासिकांसाठी मानधन देण्यात येणार आहे. पूर्ण अर्हताधारक माध्यमिक शिक्षकाला २५० रुपये प्रतितास, अपूर्ण अर्हताधारक माध्यमिक शिक्षकाला २२५ रुपये प्रतितास, प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकाला २२५ रुपये प्रतितास, तर अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकाला २०५ रुपये प्रतितास मानधन मिळणार आहे. दररोज पाच तासिका या प्रमाणे मासिक तासिका पूर्ण करणाऱ्या शिक्षकांनाच सुधारित मानधन लागू राहणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, तासिका तत्त्वावरील शिक्षकांची नियुक्ती ही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी करण्यात येणारी तात्पुरती व्यवस्था आहे. त्यामुळे या नियुक्तीतून भविष्यात सेवेत कायम किंवा नियमित होण्याचा कोणताही हक्क निर्माण होणार नाही, अशी अट शासनाने स्पष्ट केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध आदेशांचा तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकाचा संदर्भ देत ही बाब संबंधित शिक्षकांना माहीत असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

ही अट मान्य असल्याबाबत संबंधित शिक्षकांकडून ५०० रुपयांच्या मुद्रांकावर करारपत्र करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मानधनवाढीमुळे तासिका शिक्षकांना आर्थिक दिलासा मिळणार असला, तरी त्यांची नियुक्ती तात्पुरतीच राहणार आहे.

राज्यातील शासकीय निवासी शाळांमध्ये नियमित शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेली पदे आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर मानधनवाढीच्या निर्णयामुळे तासिका शिक्षकांना दिलासा मिळण्याबरोबरच निवासी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण अध्यापन उपलब्ध होण्यास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### तासिका शिक्षकांच्या मानधनात वाढ; तासाला २५० रुपये

राज्यातील शासकीय निवासी शाळांमधील तासिका तत्त्वावरील (CHB) शिक्षकांसाठी राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. पात्रतेनुसार आता शिक्षकांना २०५ ते २५० रुपये प्रतितास मानधन मिळणार असून, सुधारित दर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून लागू होणार आहेत. मात्र, नियुक्ती तात्पुरती असून सेवेत कायम होण्याचा हक्क राहणार नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

# पुण्यात टोळ्यांवर पोलिसांचा 'मकोका' चा दणका; कुरेशी गँग रडारवर

## न्यायालयाच्या आवारात हल्ल्याचा कट उघड; ठोंबरे टोळीतील तिघे अटकेत!

**पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यातील वाढत्या टोळीच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी आक्रमक पाऊल उचलले आहे. नाना पेठेतील बंडू आंदेकर टोळीचा प्रतिस्पर्धी सूरज ठोंबरे आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिले आहेत. आंदेकर टोळीचा म्होरक्या कृष्णा आंदेकर आणि त्याच्या साथीदारांवर न्यायालयाच्या आवारात हल्ला करण्याचा कट रचल्याचे उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.**



सूरज अशोक ठोंबरे (वय २४, रा. नाना पेठ), वेदांत रोहित सावंत (वय २१, रा. धनकवडी), अथर्व दत्तात्रय खोपडे (वय २१, रा. गुजरवाडी, कात्रज, मूळ रा. नाझरे, भोर), धीरज लखारा (रा. धनकवडी) आणि मानव शरद ढमाले (वय २४, रा. धनकवडी) यांच्याविरुद्ध मकोका कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी वेदांत सावंत, अथर्व खोपडे आणि धीरज लखारा यांना अटक करण्यात आली असून, सूरज ठोंबरे आणि मानव ढमाले हे फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके कार्यरत आहेत.

नाना पेठेतील वर्चस्वाच्या वादातून बंडू आंदेकर यांचा मुलगा आणि नगरसेवक वनराज आंदेकर यांचा दोन वर्षांपूर्वी सोमनाथ गायकवाड टोळीने खून केला होता. सूरज ठोंबरे हा सोमनाथ गायकवाडचा जवळचा साथीदार असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. गायकवाड सध्या कारागृहात असून, त्याच्या टोळीची सूत्रे ठोंबरे सांभाळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

कृष्णा आंदेकरला न्यायालयातून नेत असताना त्याच्यावर हल्ला करण्याचा कट ठोंबरे याने रचल्याचा आरोप आहे. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर भारती विद्यापीठ पोलिसांनी ठोंबरेच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला. ठोंबरे याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, धमकावणे, पिस्तूल बाळगणे आणि दहशत माजविणे अशा गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ठोंबरे टोळीविरुद्ध मकोका कारवाईचा प्रस्ताव भारती विद्यापीठ पोलिसांनी तयार करून अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे आणि पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांच्याकडे पाठविला होता. प्रस्तावाची पडताळणी केल्यानंतर पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी ठोंबरे टोळीविरुद्ध मकोका कारवाईचे आदेश दिले.

दरम्यान, विश्रांतवाडी आणि येरवडा परिसरात दहशत माजविणाऱ्या शोएब कुरेशी टोळीवरही पोलिसांनी मकोकाचा बडगा उगारला आहे. शोएब रशीद कुरेशी (वय २६), हुसेन अस्लम खान (वय २१, दोघे रा. चंद्रमानगर, येरवडा) आणि राज मुकेश सरवदे (वय २१, रा. भीमनगर, विश्रांतवाडी) यांच्याविरुद्ध मकोका कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. या तिघांना पोलिसांनी अटक केली असून, कुरेशीसोबत गुन्ह्यात सहभागी असलेल्या एका अल्पवयीनालाही ताब्यात घेण्यात आले आहे.

कुरेशी आणि त्याच्या साथीदारांनी एका तरुणावर हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान गुन्ह्यात कलमवाढ करण्यात आली. त्यानंतर कुरेशी आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध मकोका कारवाईचा प्रस्ताव अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांच्याकडे पाठविण्यात आला. या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी देण्यात आली.

विश्रांतवाडी परिसरातील या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, सहायक निरीक्षक सुनील उगले, मनोज शिंदे, सुनील हसबे, बबन वणवे आणि यशवंत किर्वे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

पुणे शहरातील टोळीयुद्ध, दहशत आणि संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी मकोकाचा वापर अधिक आक्रमकपणे सुरू केल्याचे या सलग कारवायांमधून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे गुन्हेगारी टोळ्यांमध्ये पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे खळबळ उडाली आहे.

# भरधाव कार दुभाजकाला धडकून ओढ्यात कोसळली; २ तरुणांचा मृत्यू

**पुणे | प्रतिनिधी**

**जुन्या पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर मावळ तालुक्यातील वाकसई येथे गुरुवारी पहाटे भीषण अपघात झाला. भरधाव मोटार दुभाजकाला जोरदार धडकून रस्त्यालगतच्या ओढ्यात कोसळली. या दुर्घटनेत मोटारीतील दोन तरुणांचा मृत्यू झाला, तर वाहन चालक गंभीर जखमी झाला. हा अपघात पहाटे चारच्या सुमारास घडला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.**



या अपघातात हुसेन गोधरावाला (वय २७, रा. कोंढवा, पुणे) आणि आसीर इनामदार (वय २६, रा. नेहरूनगर, पुणे) यांचा मृत्यू झाला. वाहन चालक अनिकेत गौतम बरवा (रा. मोशी) हा या अपघातात जखमी झाला असून त्याच्याविरोधात लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस शिपाई गोकुळ खेडकर यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिकेत बरवा आणि त्याचे दोन मित्र मोटारीतून जुन्या पुणे-मुंबई महामार्गाने प्रवास करीत होते. पहाटेच्या सुमारास त्यांची मोटार मावळ तालुक्यातील वाकसई परिसरात आली. यावेळी मोटारीवरील चालकाचे अचानक नियंत्रण सुटले. भरधाव वेगातील मोटार रस्त्याच्या बाजूला असलेल्या दुभाजकाला जोरदार धडकली.

दुभाजकाला धडकल्यानंतर मोटार थेट रस्त्यालगत असलेल्या ओढ्यात जाऊन कोसळली. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने मोटारीचे मोठे नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. बचावकार्य करून मोटारीतील तिघांना बाहेर काढण्यात आले. मात्र, हुसेन गोधरावाला आणि आसीर इनामदार यांचा गंभीर दुखापतींमुळे मृत्यू झाला.

अपघातात चालक अनिकेत बरवा हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर लोणावळा ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. अपघातग्रस्त मोटार ओढ्यातून बाहेर काढण्यात आली असून दुर्घटनेबाबत अधिक तपास सुरू आहे.

दरम्यान, पहाटेच्या वेळी महामार्गावर वाहनांची वर्दळ तुलनेने कमी असते. अशा परिस्थितीत भरधाव वेगाने वाहन चालविताना चालकाचे नियंत्रण सुटल्यास गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता वाढते. वाकसई येथे झालेल्या या अपघाताने पुन्हा एकदा महामार्गावरील वेग आणि सुरक्षिततेचा प्रश्न अधोरेखित केला आहे.

मोटारीवरील नियंत्रण नेमके कोणत्या कारणामुळे सुटले, वाहनाचा वेग किती होता आणि चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाला का, याचा तपास लोणावळा ग्रामीण पोलीस करीत आहेत. या तपासातून अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.